MHNS140014952024

## नियमित दिवाणी दावा क्रं.२६४/२०२४ मधील नि.क्र. २२ वरील आदेश

प्रतिवादी क्र. ३ तर्फे प्रस्तुतचा अर्ज हा कैफियत व जबाब दाखल करण्यास झालेला ४ महिने ०३ दिवसांचा विलंब माफ होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. सदर प्रतिवादीने असे कथन केले आहे की, त्यांना दाव्याची माहिती घेवून त्या कामी आवश्यक ते कागदपत्र मिळवणेकामी बराच कालावधी लागला त्यामुळे त्यांना मुदतीत जबाब व कैफियत दाखल करता आला नाही. सदरील विलंब या प्रतिवादीने जाणुनबुजून किंवा हेतुपुरस्सर पणे केला नाही. योग्य व वाजवी कारणास्तव कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. सदर प्रतिवादीची कैफियत व जबाब दाव्यात दाखल करुन घेणे न्यायाच्या व कायदयाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. तसे झाले नाही तर या प्रतिवादीला त्याची बाजू न्यायालयासमोर योग्य प्रकारे मांडता येणार नाही व या प्रतिवादीचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल. सबब, प्रतिवादीला कैफियत व जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून त्यांची कैफियत व जबाब अभिलेखावर दाखल करण्यात यावी.

३. वादीच्या वकिलांचे असे कथन आहे की, सदरचा अर्जातील मजकूर वादींनी

नाकारला आहे. सदर प्रतिवादीने विलंबाबाबत कोणतेही योग्य व संयुक्तिक कारण दिले नाही. त्यांनी जाणूनबूजून विलंबाने कैफियत दिलेली आहे. सदर अर्ज रद्द करण्यात यावा. याउपर न्यायालयाचे अर्ज मंजूर करावा असे मत पडल्यास वादींना योग्य ती कॉस्ट देण्यात यावी.

**४.** अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला.

**५.** न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी तसेच स्वतंत्रपणे कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता सदर प्रतिवादीला त्यांची कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे, तसेच सदर आदेशामुळे वादीला होणा–या नुकसानी साठी वादील कॉस्ट देणे गरजेचे आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१. प्रस्तुत प्रतिवादीने वादीला रक्कम रुपये ५००/– देणेचे अटीवर अर्ज नि.क्र.२२ मंजूर करण्यात येतो.

२. सदर कॉस्टची रक्कम वादीला अदा केल्यानंतर प्रस्तुत प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येईल.

PANDIT ASHWINI ANIL
Digitally signed by PANDIT ASHWINI ANIL
Date: 2026.03.10 17:22:07 +0530

दि. १०/०३/२०२६ (ए. ए. पंडित)
दिंडोरी. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दिंडोरी.